# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२१०८४२/२१/अ.क्र.५८१५/२४**

श्री.भारत पुरोहित

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व का.) डी विभाग
सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, डी विभाग, नाना चौक,
जोबनपुत्र कंपाऊंड, ग्रँट रोड (प.), मुंबई-४०० ००७.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत व का.) डी विभाग
सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, डी विभाग, नाना चौक,
जोबनपुत्र कंपाऊंड, ग्रँट रोड (प.), मुंबई-४०० ००७.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७-११-२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित. ट्रॅक रिपोर्टप्रमाणे नोटीस दि.३०.१०.२०२४ रोजी प्राप्त. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २५-०८-२०२० | १८-०९-२०२० | २७-११-२०२० | २४-१२-२०२० |

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि.२५-०८-२०२० नुसार रसधारा गृहनिर्माण सहकारी संस्था लि. यांनी एमएमसी ॲक्ट दि.०४-०६-२०२० शी संबंधित माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) डी विभाग यांनी दि.१८-०९-२०२० अन्वये अपिलकर्तांना निरीक्षणासाठी कार्यालयात उपस्थित रहावे असे उत्तर दिले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी (इ. व का.) डी विभाग यांचे समोर सुनावणी दरम्यान अपिलकर्तांनी नमूद केले की, जन माहिती अधिकारींनी माहिती स्वाक्षरीविना देण्यात आली आहे. प्रथम अपिलीय अधिकारींनी दि.२४-१२-२०२० अन्वये जन माहिती अधिकारींनी अपिलकर्तास उचित व विहीत कालावधीत उत्तर दिले आहे असे नमूद करुन अपिल निकाली काढले.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि.०१-०३-२०२१ नुसार पूर्ण माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता अनुपस्थित. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) डी विभाग आणि प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ. व का.) डी विभाग उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) डी विभाग यांनी सादर केले की, अपिलकर्तास दि. ११-११-२०२० रोजी शासकीय शुल्क भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) डी विभाग यांनी आयोगास सादर केले की, सदर विषयाबाबत अपलिकर्ता यांनी मा.लोक आयुक्त यांचेकडे सुध्दा तक्रार केली होती आणि मा.लोक आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार अपिलकर्तास कागदपत्रांची छायांकित प्रत दि.२९-१२-२०२२ रोजी विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारींनी अपिलकर्तांना माहिती दिली आहे. सबब, अपिल निकाली काढण्यात येत आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

प्रदीप व्यास 7-11-2024

**मुंबई**
**दिनांक : ०७-११-२०२४**

**( डॉ.प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**